**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बौद्ध धम्माकरिता योगदान

**प्रा. नरेंद्र विश्वनाथ झाडे**
श्री. गोविंदप्रभू कला व वाणिज्य महाविद्यालय,
तळोधी (बाळापूर), ता. नागभीड, जि. चंद्रपूर (म. रा.)
९९२३९८७८२१

**प्रस्तावना :-**

१४ ऑक्टोंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी अभुतपूर्व क्रांती घडवून आणली त्याला जागतिक इतिहासात तोड नाही. त्यांनी नागपूरच्या भूमीवर पाच लाख अनुयायांसह बौद्ध धर्माचा स्वीकार करून केवळ अस्पृश्यांनाच नाही तर संपूर्ण भारतीय जनतेला लाचार, दैववादी, अन्यायी अशा मानसिकतेतून बाहेर काढले. सोबतच समता, स्वातंत्र्य व बंधुता या तत्त्वांचा स्वीकार करून आपली व आपल्या समाजाची कशी प्रगती करता येऊ शकते यासाठी मार्ग तयार केला. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांचे जीवनमान बदलणारी धर्मांतर चळवळ म्हणून या घटनेकडे बहुतांश लोक बघतात. परंतु बाबासाहेबांच्या या घटनेमुळे भारतामधून हद्दपार झालेला, भारतीय मनातून पुसून गेलेला; परंतु अजूनही काही अंशी आचरणात शिल्लक असलेला बहुजनांचा आचार धम्म त्यांनी पूर्नजीवित केला. ही त्यांनी भारतीय जनतेला दिलेली मोलाची देणगी आहे. तसेच जगातील बौद्ध धर्माला दिलेले महान योगदान आहे. त्यांच्या या कृतीमुळे भारत देशाकडे संपूर्ण जग एका वेगळया दृष्टीने बघतो. भारताची जगामध्ये जी काही महत्ता आहे ती केवळ बौद्ध धम्म व त्यांच्या विचारप्रणालीमुळे हे आपणास मान्य करावे लागेल.

**धर्मांतराच्या घोषणेची पार्श्वभूमी :-**

हिंदू धर्म चिकित्सेने धर्मांतराचा प्रारंभ झाल्याचे मानता येईल. कारण हिंदू धर्माच्या जाचक तत्त्वांना मान्यता देणे कोणत्याही शिक्षित व्यक्तीस शक्य नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बार्शी येथील बहिष्कृत हितकारिणी सभेद्वारा आयोजित सभेतील भाषणात अप्रत्यक्षपणे धर्मांतराचा विचार व्यक्त केला. मे १९२४ मध्ये केलेल्या या भाषणात त्यांनी हिंदू धर्माविषयी नाराजी प्रकट केली. अगदी प्रारंभीच्या काळातील या सभेला अस्पृश्य बांधवांना मार्गदर्शन करताना ते म्हणतात की, 'ज्या धर्मात माणसाला माणुसकी नाही तो धर्म काय कामाचा? जो धर्म त्याच्या अनुयायांना ऐहिक आणि पारलौकिक सुखाची दारे मोकळी करण्याऐवजी ती बंद करुन त्यांना अधोगतीत खितपत पडावयास लावतो. त्या धर्माला चिकटून राहण्यात काय अर्थ आहे. उलट धर्मांतर केल्याबरोबर जर हेच लोक आपली मोजदाद माणसात करुन आपल्याला समानतेने वागवतात. तर धर्मांतर का करु नये हे मला कळत नाही..... माझी खात्री आहे की, आता आपण धर्मत्याग केला तर जे हिंदू लोक आपला तिरस्कार करतात तेच आपल्याला मान देतील.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत' या पाक्षिकात आपल्या धर्मांतराच्या भूमिकेची मांडणी केलेली दिसते. तेव्हाच बहिष्कृत भारतात धर्मांतराच्या प्रश्नालाही तोंड फुटल्याचे दिसते. जळगावच्या पाच हजार महारांनी हिंदूंना धर्मांतराची नोटीस दिल्यामुळे त्यांना सल्ला देतांना डॉ. बाबासाहेब म्हणाले, 'धर्मांतर केल्याशिवाय अस्पृश्यता दूर करुन घेण्याचा मार्ग कठीण आहे. अस्पृश्यतेच्या उच्चाटनाचा प्रश्न ज्याला सोडविता येईल त्याने तसा

सोडवावा.' धर्मांतराचा विचार चळवळीच्या प्रारंभापासूनच चर्चेत होता. तरीही हिंदू धर्मात राहूनच आपले मानवी हक्क मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न सुरु होता. आपल्या प्रामाणिक प्रयत्नांनी हिंदूंमध्ये समता व संघटन निर्माण करता येईल असे त्यांना वाटत असावे. परंतु सनातनी हिंदूंचे मत परिवर्तन होणे शक्य नव्हते. तेव्हा १३ ऑक्टोंबर १९३५ ला त्यांनी येवला परिषदेत हिंदू धर्म त्यागाची घोषणा केली. पस्तीस वर्ष सर्व धर्माचा सखोल अभ्यास केल्यानंतर, जर एखाद्या विज्ञाननिष्ठ आधुनिक व्यक्तीला धर्म हवा असेल तर त्याला भगवान बुद्धाच्या धम्माशिवाय पर्याय नाही असे बाबासाहेब म्हणत असत. त्याला कृतीमध्ये आणण्यासाठी त्यांनी नागपूरला धम्म दीक्षा घेतली.

**बौद्ध धम्मातील योगदान :-**

भगवान बुद्धाचे जीवन आणि शिकवण सुसंगतपणे सादर करणे जे बौद्ध नाही त्याला फारच कठीण काम होते. जगात जेवढे धर्म संस्थापक होऊन गेले त्यापैकी बौद्ध धम्माच्या संस्थापकाचे जीवन व शिकवण सुसंगत अभिव्यक्ती प्रस्तुत करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. तसेच बौद्ध धम्मात येणाऱ्यांना बाविस प्रतिज्ञांचे पालन करण्यासाठी महान योगदानही दिले आहे. त्याचा आढावा आपण खालीलप्रमाणे पाहू -

**१) भगवान बुद्धाची परिव्रज्या :-**

पहिला वादग्रस्त प्रश्न भगवान बुद्धाच्या जीवनातील आहे तो म्हणजे परिव्रज्या. भगवान बुद्धांनी परिव्रज्या का ग्रहण केली? त्याचे पारंपरिक उत्तर म्हणजे त्यांनी जराजर्जर मनुष्य, एक रोगी व्यक्ती आणि एका मृतदेहाच्या शवाला पाहिले म्हणून. बुद्धानी आपल्या वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी परिव्रज्या ग्रहण केली. ह्या तीन दृश्यांची परिणती म्हणून जर त्यांनी परिव्रज्या ग्रहण केली असती तर ती तीन दृश्ये तत्पूर्वी त्यांना कधीच कशी दिसली नाहीत? ह्या तर शेकडोंनी – हजारोंनी घडणाऱ्या घटना आहेत आणि त्या तत्पूर्वी बुद्धांच्या सहजच नजरेस न येणे असंभाव्य होते. त्यांनी त्या ह्याच वेळी प्रथम पाहिल्या हे पारंपरिक स्पष्टीकरण अमान्य करुन खरे कारण शाक्य आणि कोलियामध्ये रोहिणी नदीच्या पाणी वाटपावरुन घडलेला प्रसंग बाबासाहेबांनी जगासमोर आणून भगवान बुद्धाच्या विचाराला तर्कसंगत स्पष्ट केले.

**२) भगवान बुद्धांची चार आर्यसत्य :-**

भगवान बुद्धाच्या मूळ शिकवणीत चार आर्यसत्यांचा अंतर्भाव होतो काय? हे सूत्र बौद्ध धम्माच्या मुळावरच आघात करते. जीवन हे जर दु:ख आहे, मृत्यू हे जर दु:ख आहे आणि पूनर्जन्म हे जर दु:ख आहे; तर सर्व काही संपलेच म्हणायचे. ह्या जगात ना धर्म कोण्या माणसाला सुखी करु शकतो, ना तत्त्वज्ञान सुखी करु शकतो. जर दु:खापासून मुक्तीच नसेल तर धर्म तरी काय करु शकणार! ही चार आर्यसत्ये. ज्यात प्रथम आर्यसत्य हेच दु:ख आर्यसत्य आहे. अबौद्धांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करण्याच्या मार्गात एक मोठाच अडथळा आहे. ही गोष्ट त्यांच्या बुद्धीस पटू शकत नाही. कारण असे वाटते की, ही चार आर्यसत्य मानवाला आशा नाकारतात आणि त्याला निराशेच्या खोल खाईत ढकलून देतात. ही चार आर्यसत्ये भगवान बुद्धाच्या धम्माला निराशावादी ठरवतात. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भगवान बुद्धाचा मध्यम मार्ग असून तोच सदधम्म आहे हे पटवून दिले. भगवान बुद्ध मैत्री, प्रेम, दया, करुणा आणि बंधुभावाची शिकवण देतात. जी माणसाला आपल्या बांधवांची बंधमुक्तता करण्यास सहाय्यभूत होते. तपश्चर्या किंवा आत्मक्लेश हा मार्गही दु:खदायक, अयोग्य आणि हाणीकारक आहे. त्यांच्या धम्मात ईश्वर आणि आत्मा यांच्याशी काहीही घेणे देणे नाही. बुद्धाच्या धम्माचा केंद्रबिंदू माणूस असून, जगातून दु:ख नाहीसे करणे हा

बौद्ध धम्माचा उद्देश आहे. दु:खाचे अस्तित्व मान्य करणे आणि ते नष्ट करण्याचा मार्ग दाखविणे हीच भगवान बुद्धाच्या धम्माची आधारशीला आणि पाया होय, हे स्पष्ट करुन दाखविले.

**३) आत्मा, कर्म आणि पूनर्जन्म तत्त्व :-**

भगवान बुद्धांनी आत्म्याचे अस्तित्व नाकारले आहे. पण त्यासोबतच त्यांनी कर्म आणि पूनर्जन्म ह्याबद्दलची तत्त्वे दृढतया प्रतिपादन केली आहेत असे सांगितले जाते. मग लगेच प्रश्न उपस्थित होतो की, जर आत्मा नाही तर कर्म कसे असू शकेल? जर आत्मा नाही तर पूनर्जन्म कसा असू शकेल? हे गोंधळ निर्माण करणारे प्रश्न आहेत. भगवान बुद्धांनी कर्म आणि पूनर्जन्म हे शब्द कोणत्या विशिष्ट अर्थी वापरले? त्या काळी ब्राम्हण वापरत त्यापेक्षा निराळ्या अर्थी हे शब्द त्यांनी वापरले काय? असे जर असेल तर आत्म्याचा अस्विकार आणि कर्म व पूनर्जन्म ह्यांचे दृढ प्रतिपादन ही भयानक विसंगती नाही काय? ही विसंगती उकलण्याचे कार्य बाबासाहेबांनी केलेले आपणास दिसून येते.

**४) भिक्खू संघाबद्दल वाद :-**

भिक्खू संघाची स्थापना करण्यात भगवान बुद्धांचा काय हेतू होता? एक समाजनिरपेक्ष आदर्श पुरुष निर्माण करणे हा त्यांचा हेतू होता काय? की जनतेच्या सेवेला आपले आयुष्य वाहिलेला आणि त्यांचा मित्र, मार्गदर्शक आणि तत्त्वज्ञ असलेला एक समाजसेवक निर्माण करणे हा हेतू होता. हा एक अगदी महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यावसर बौद्ध धम्माचे भवितव्य अवलंबून आहे. जर भिक्खू हा केवळ आदर्श पुरुषच असेल तर बौद्ध धम्माच्या प्रसाराला तो उपयोगी होत नाही. कारण जरी तो पूर्ण पुरुष असला तरी तो स्वार्थी पुरुषच राहणार आहे. उलटपक्षी जर समाजसेवक असला तर बौद्ध धम्मास तो आशाजनक होऊ शकेल. ह्या प्रश्नावर गंभीरतापूर्वक विचार करण्याचे काम बाबासाहेबांनी केले. केवळ तात्विक सुसंगतीच्या हिताच्या दृष्टीने नव्हे तर बौद्ध धम्माच्या भवितव्याच्या हिताच्या दृष्टीने विचार करण्याचे काम बाबासाहेबांनी केले.

**५) बाविस धम्म प्रतिज्ञा :-**

सन १९५६ साली १४ ऑक्टोंबरला विजयादशमीच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथे आपल्या पाच लाख अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. त्या धम्मचक्र प्रवर्तनाच्या दिवशी त्यांनी आपल्या अनुयायी बांधवांकडून मार्गदर्शनपर अशा २२ प्रतिज्ञा म्हणून घेतल्या आणि प्रत्येक बौद्धाने त्याचे कसोशीने पालन करावे अशी सूचना केली. त्या २२ प्रतिज्ञा खालील प्रमाणे –

१) मी ब्रम्हा, विष्णू, महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
२) मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
३) मी गौरी, गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
४) देवाने अवतार घेतले यावर माझा विश्वास नाही.
५) बुद्ध हा विष्णूचा अवतार होय. हा खोटा व खोडसाळ प्रचार आहे असे मी समजतो.
६) मी श्राद्धपक्ष करणार नाही. पिंडदान करणार नाही.
७) मी बौद्ध धम्माला विसंगत असे कोणतेच आचरण करणार नाही.

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

८) मी कोणतेही धार्मिक क्रियाकर्म ब्राम्हणाचे हातून करवून घेणार नाही.

९) 'सर्व मनुष्यमात्र समान आहेत असे मी मानतो.

१०) मी समता स्थापण्याचा प्रयत्न करील.

११) मी भगवान बुद्धांनी सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करील.

१२) मी बुद्धाने सांगितलेल्या दहा पारमिताचे पालन करीन.

१३) मी प्राणीमात्रांवर दया करील, त्याचे लालनपालन करील.

१४) मी चोरी करणार नाही.

१५) मी खोटे बोलणार नाही.

१६) मी व्यभिचार करणार नाही.

१७) मी दारु पिणार नाही.

१८) ज्ञान, शील आणि करुणा या बौद्ध धम्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून मी माझे जीवन चालवीन.

१९) मी माझ्या जुन्या मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक आणि मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा त्याग करतो व बौद्ध धम्माचा स्वीकार करतो.

२०) बौद्ध धम्म हाच सध्दम्म आहे अशी माझी खात्री पटलेली आहे.

२१) माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो.

२२) मी सर्वत्र बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागेल अशी मी प्रतिज्ञा करतो.

**निष्कर्ष :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना माहीत होते की, बौद्ध धम्म हा जागतिक शांततेचा मार्ग सुकर करण्यास सक्षम आहे. विश्वशांती आणि अहिंसावादाचे महनीय तत्त्वाचे प्रतिपादन करुन बौद्ध धम्म मानवी कल्याणाचा आदर्श समाजात घालून देतो. बुद्ध धम्माचे बहुमोल तत्त्वांचे भारतीय सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय जीवनाला वेगवेगळ्या क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले आहे. बुद्ध धम्माच्या रुपात भारताला आणि एकूणच जगाला एक विज्ञाननिष्ठ धर्म मिळाला आहे. बौद्ध धम्मामध्ये संपूर्ण विश्वाला बंधुत्वाच्या धाग्यामध्ये बांधून ठेवण्याचे विचार अंतर्भूत आहे. शांती आणि अहिंसा या तत्त्वाचा अवलंब केल्यास संपूर्ण मानवजाती एकोप्याने नांदू शकतात एवढी ताकद बौद्ध धम्मात आहे. परंतु बौद्ध धम्माच्या काही तत्त्वात विसंगती निर्माण झाल्याने त्याचे तर्कसंगत, विज्ञाननिष्ठ, बुद्धिवादी स्वरुप नष्ट झालेले होते. म्हणून त्याला तर्कसंगत व शुद्ध रुपात आणण्याचे काम डॉ. बाबासाहेबांनी केले. त्यासाठी त्यांनी बौद्ध साहित्यामध्ये असलेल्या विसंगतीचे समर्पकपणे विश्लेषण करुन भगवान बुद्धाच्या धम्माचे खरे रुप कसे असेल हे विविध उदाहणाद्वारे स्पष्ट केले. एवढेच नव्हे तर संपूर्ण भारतात व विश्वात बौद्ध धर्माला शुद्ध रुपात पोहचविण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बौद्ध धम्मासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. डॉ. आंबेडकर भीमराव रामजी, 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म', डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स (बानाई), नागपूर.

२. कांबळे अरुण, 'धर्मांतराची भीम गर्जना', सुगावा प्रकाशन, पुणे.

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

३. डॉ. जाधव नरेंद्र, 'बोल महामानवाचे', ग्रंथाली प्रकाशन, वुलन मील म्युनिसिफल स्कुल, माटूंगा (प.), मुंबई.
४. 'लोकराज्य', धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक, ऑक्टोंबर २००६.
५. आपटे वासुदेव गोविंद, 'बौद्ध पर्व अथवा बौद्ध धर्माचा साद्यंत इतिहास', समता प्रकाशन, नागपूर.
६. कीर धनंजय, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९.
७. डॉ. धर्मकिर्ती, 'बुद्ध का नितीशास्त्र', सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, २००८.
८. कौसांबी धर्मानंद, 'बुद्ध धर्मावरील चार निबंध'.
९. गवळी सुधीर (संकलक), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बुद्ध धर्मावरील भाषणे', सुधीर प्रकाशन, वर्धा.